# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेसनोट** दिनांक ०१/०३/२०२०

**घर मालकाच्या घरात ९,१७,०००/- रु किमतीचे सोन्याचे दागीने चोरणा-या नोकरास सांगवी पोलीसांनी १२ तासांच्या आत ठोकल्या बेडया**

सांगवी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात २४ के. ग्लिटराटी सोसायटी, फ्लॅट नं डी- १२०२ न्यु.डी.पी रोड विशालनगर पिंपळे निलख पुणे येथे राहणा-या जेष्ठ नागरीक सौ जयंती वासुदेवन अय्यंगार यांचे घरी दिनांक १०/०२/२०२० ते दिनांक २६/०२/२०२० रोजी दरम्यान त्याचे फ्लॅटमधील बेडरुममधील लाकडी कपाटात ठेवलेले ९,१७,०००/- रु किमतीचे सोने, हि-यांचे दागीन व गोल्ड कॉईन अज्ञात चोरटयाने चोरी केले म्हणुन तक्रारदार यांचे तक्रारीवरुन सांगवी पोलीस ठाणेस गुन्हा रजि. नं. ६५/२०२० भा.दं.वि. कलम ३८० प्रमाणे दिनांक २६/०२/२०२० रोजी रात्री ११:२७ वा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना फिर्यादी नामे जयंती वासुदेवन अय्यंगार यांचे घरी दिनांक २७/०२/२०२० रोजी सकाळी ०९:३० वा तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक, दत्तात्रय गुळीग, सोबत पोलीस उप निरीक्षक यशवंत साळुंके, पोलीस नाईक ८७३ केंगले, पोलीस शिपाई १५७६ नरळे, पोलीस शिपाई १६७६ खोपकर, पोलीस शिपाई १६७९ देवकर असे जावुन घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण करुन फिर्यादी व त्यांचे पती यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली. त्यानंतर सोसायटीमधील सी.सी.टी.व्ही फुटेज ची पडताळणी केली असता फुटेजमध्ये एक संशयीत इसम निर्दशनास आला त्यानंतर सदर इसमाचा पिंपळे निलख, विशालनगर भागात शोध घेत असताना त्याबाबत माहीती मिळाली की सदरचा संशयीत इसम हा के/ऑ संजय इंगवले, भैरवनाथ मंदीर जवळ, पिंपळे निलख गावठाण, पुणे येथे राहात आहे.

त्यानंतर तपास पथकाची टीम के/ऑ संजय इंगवले, भैरवनाथ मंदीर जवळ, पिंपळे निलख गावठाण, पुणे येथे जावुन संशयीत इसमाचे घरी गेली असता तो घरी मिळुन आल्याने त्याने त्याचे नाव नामदेव विठ्ठल चव्हाण असल्याचे सांगीतले व त्याचेकडे दाखल गुन्हयातील चोरीस गेले सोन्याचे दागीने बाबत विचारपुस केली असता त्याने तपास पथकास समाधानकारक उत्तरे दिली नाही व त्यास विचारलेल्या प्रश्नांची त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिल्याने त्याच्यावर अधिक संशय बळावल्याने त्यास ताब्यात घेवुन सांगवी पोलीस ठाणे येथे आनुन त्यास विश्वासात घेवुन त्याचेकडे दाखल गुन्हयातील चोरीस गेले सोन्याचे दागीने बाबत अधिक चौकशी केली असता त्याने सांगीतले की "मी गेली ३ वर्षापासुन जयंती वासुदेवन अय्यंगार यांच्या घरी कुक व झाडु-पोचा करण्याचे काम करीत असताना यांच्या घरातील बेडरुममधील लाकडी कपाटातील सोन्याचे दागीने चोरी केले आहे". त्यानंतर आरोपी यास दाखल गुन्हयात दिनांक २७/०२/२०२० रोजी १२.३० वाजता अटक करुन दाखल गुन्हयात भा.द.वि.स कलम ३८१ प्रमाणेची वाढ करुन त्यास मा. न्यायालयासमक्ष हजर केले असता मा. न्यायालयाने दिनांक ०२/०३/२०२० रोजी पर्यंत पोलीस कोठडी दिली असता पोलीस कोठडीत असताना आरोपीकडुन त्याने दाखल गुन्हयातील चोरलेले खालील वर्णनाचे सोन्याचे दागीने जप्त केले आहे.

**१) ५२,०००/- रु किमतीचे अंदाजे १२ ग्रॅम वजनाची सिल्व्हर रंगाचे रेडीयम कोटेड डिजाईन असलेली बोगडी**
**२) ८,००,०००/- रु किमतीचा २०.४५६ ग्रॅम वजनाचा सोने व हि-यांचा हार (नेकलेस)**
**३) ६५,०००/- रु किमतीचे १४ ग्रॅम वजनाचे दोन सोन्याचे कॉईन**

---

**एकुण ९,१७,०००/- रु किमतीचे सोन्याचे व हि-यांचे दागीने व गोल्ड कॉईन**

येणेप्रमाणे वरील वर्णनाचे सोन्याचे, हि-यांचे दागीने व गोल्ड कॉईन आरोपी नामे नामदेव विठ्ठल चव्हाण रा- के/ऑ संजय इंगवले, भैरवनाथ मंदीर जवळ, पिंपळे निलख गावठाण, पुणे यांचेकडुन जप्त करण्यात आले आहे.

सदर कामगिरी मा. श्री संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त सो., पिंपरी चिंचवड, मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त सो, पिं.चिं.पो. आयुक्तालय, मा. श्री. विनायक ढाकणे, पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२, पिं.चि.पो. आयुक्तालय, मा. श्री. श्रीकांत मोहिते, सहायक पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिं.चिं.पो. आयुक्तालय, मा. श्री. ज्ञानेश्वर साबळे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो., सांगवी पोलीस ठाणे, मा. श्री. अजय भोसले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सो, सांगवी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी दत्तात्रय गुळीग, यशवंत साळुंके, पोलीस उप निरीक्षक, व सांगवी पोलीस ठाणे येथील तपास पथकातील कर्मचारी चंद्रकांत भिसे, रोहिदास बोहाडे, कैलास केंगले, सुरेश भोजणे, नितीन दांगडे, अरुण नरळे, नितीन खोपकर, शशिकांत देवकांत, विनायक देवकर, अनिल देवकर, हेमंत गुत्तीकोंडा, शिमोन चांदेकर यांनी केली आहे.

